International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.2 Nov-Dec- 2022

# चित्रपटाच सौंदर्यशास्त्र आणि निऑरिअलिस्ट दिग्दर्शक नागराज मंजुळे च्या दिग्दर्शनामागचा समकालिन वैचारिक दिशाकोन

**प्रा.घन:श्याम पुंडलिक थोरात**
प्रमुख विश्वस्त – डॉ.बाबासाहेब आंबेडकर, इन्सिट्युट ऑफ फिलॉसॉफी, पुणे.
संस्थापक – रॅशनल इंडीया युनिर्व्हसिटी, पुणे.सुरत बायपास रोड, महिंदळे शिवार, धुळे.
Email – ghanshyamji561977@gmail.com
*DOI- 10.5281/zenodo.7613829*

## प्रस्तावना :–

चित्रपटाचा एकूणच आशय, सुत्र, कथा, सादरीकरण, दिग्दर्शन, निर्मिती च्या प्रवाहातून जाणवणारी अनुभूतीच जे क्षितीज असतं, त्या दिग्दर्शनाच्या नजरेतून प्रेक्षक हा घटक चित्रपटाची आस्वादकता, सौंदर्य टिपत असतो. ह्यात बघणाऱ्याच्या दृष्टीचं ॲटीट्युड, **ट्रान्समीशन** करण्याच सामर्थ्य म्हणजेच दिग्दर्शकाच यशापशय अथवा तादात्म्यता सिध्दी होत असते. समष्टी विषयीचा दृष्टीकोन, अभिरूची, त्यावरचे त्यातले सामाजिक घटक, कथानक हा नेणीव च्या पातळीवर बघणाऱ्या लाखों लोकांची सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया घडवत असतो. नव्हे दिग्दर्शकाच्या डोळयातूनच प्रेक्षक चित्रपट पाहत असतो. चित्रपटाचं सौंदर्यशास्त्र म्हणजे काय ? हे नव्याने आपल्या समकालिन साहित्याच्या शानदार रूबाबदार परंतु व्यवस्थेच्या वेदनांनी फुललेला जखमांनी अभिव्यक्तीच्या अविष्कार रेखांकित करणाऱ्या मनस्वी कवी, अभिनेता, लेखक, निऑरिअलिस्ट् निर्माता, दिग्दर्शक नागराज मंजुळेचं दिग्दर्शनाचं यथोचित समकालिन आकलन तिचा दृष्टीकोन समजून घेणं आवश्क्क ठरते.

## शोधनिबंधाचे प्रयोजन :–

निव्वळ मनोरंजन हेच कलेचं प्रयोजन नसून व्यवस्थेला अदृश्यपणे प्रश्न विचारून मनोरंजना च्या अभिरूची ला जमिनीवर आणत सामाजिक वास्तव्याची जाणीव करून देतं, त्यातून सामाजिक एकतेच, सौहार्दाचं, मानवी हक्क् अधिकार, सामाजिक न्यायमुल्यांची प्रस्थापना, पुनर्जीवन करणाऱ्या प्रयोजन कलेचं

असलं पाहिजे. साहित्याचं असलं पाहिजे. ही भूमिका प्रत्यक्षपणे निक्षुन सांगणारा दिग्दर्शनाचा सज्जड दिशाकोन, दिग्दर्शक नागराज मंजुळेंनी सतत जपत आले आहेत. नव्हे येणाऱ्या नव्या पिढीतला नव्या दिग्दर्शकांना मार्गदर्शन देणारी ही निर्मितीसंहिता म्हणजे खरा समकालिन वैचारिक दिशाकोन आहे. त्याचे नेमकं स्वरूप दिशा सांगण्याचा ह्या शोधनिबंधाचा हेतू आहे.

**विषय विवेचन :–**

समाजशास्त्रीय भूमिकेतून साहित्याची पध्दतशीर मांडणी करण्याचा मान फ्रेंच समिक्षक एच.ए.तेन यांच्याकडे जातो.त्यांनी 1864 मध्ये इंग्रजी साहित्याचा इतिहास फ्रेंच भाषेत लिहीला. 1872 त्याचे पुन्हा इंग्रजीत भाषांतर झाले. साहित्य समिक्षेची भूमिका तिचे कार्य, भोवतालच्या परिस्थितीचा (सामाजिक पर्यावरणाचा) आणि साहित्याचा अन्योन्य संबंध स्पष्ट करणे या विषयी अचूक स्पष्टीकरण त्याने दिले. तेन च्या मते कोणतीही साहित्य कृती घेतली तरी ती केवळ कल्पनांचा खेळ किंवा उद्दिवित मेंदूतून निघालेली एक क्षणिक लहर असत नाही. ती लिहीणारा साहित्यिक ज्या समाजात वावरतो, त्या समाजाचा, त्याच्या देशाचा, त्या देशातील इतिहास, भूगोल, संस्कृतीचा तो लेखक ज्या काळात जगला त्या काळातल्या युगधर्माचा एकसमयावच्छेदेवरून त्याच्या कृतीवर परिणाम होत असतो. या सर्व घटकांचे परिशीलन केल्यानंतर त्या कलाकृतीचे सम्यक दर्शन खऱ्या अर्थानं घडत असतं. अर्थात लेखकाची प्रामाणिक कृती, त्याची सत्य मांडण्याची प्रमाणबध्दता, वास्तव रेखाटणारी स्वाभाविकता हे ही गुणधर्म आवश्यक असतात. स्वतिजाची अनावर आटे, नाविन्याची आस, आत्मविकार, आत्मनिष्ठता, उस्फूर्तता, बंडखोरपणा, कृतिमतेला फाटा, भावनात्मकता, ग्रामीण जीवनाविषयी आकर्षण, निसर्गप्रेम, गुढगुंजन, अकारण हुरहुर, निराशा, दुःखावर, वैरनेशी प्रेम, ही सौंदर्यवादाची लक्षणे आहेत. सामान्यत: 1850 ते 1930-35 पर्यंत सौंदर्यवादाचा प्रभाव मराठी साहित्यावर दिसतो. सौंदर्यवादाचे काही घटक समकालिन प्रवाहाला प्रभावित करत वास्तववादाशी तात्वीक आदर्शवादाला स्विकारत 19व्या शतकाच्या पूर्वधीमध्ये फ्रांसमध्ये “बालझॅक” ह्या वास्वतवादाचा पुरस्कर्ता मानला जातो. लेखकाने आपला सामाजिक

पर्यावरणाचा अभ्यास केलाच पाहिजे. नव्हे त्याला सुक्ष्म निरिक्षणातून सत्वशिल साहित्य निर्माण होत असते, कशी आग्रही भूमिका त्याची होती.

जीवनाचं सम्यक आकलन करणारी मन:शांती म्हणजेच "सौंदर्यवृत्ती" होय. अर्थात कलावंत हा या सौंदर्यवृत्तीचा उपासक होय. जीवनाच्या सम्यक आकलनातून लाभलेला ह्या सौंदर्यवृत्तीमुळे ज्ञानेंद्रीयांची, भावविश्वाची, वैवच्छेदक बुध्दीची स्विकार क्षमताच तीक्ष्ण, उत्कट आणि प्रखर प्रज्ञानी होते. जीवनाचं मर्म कळल्याने अंर्तमुख करणारे माणूसपणाचं क्षितीज विस्तारणारा परावर्तित होत असतो. Asthetic Judgement – सौंदर्यनिर्णय व Asthetic Sensibility – संवेदनशील सौंदर्यवृत्ती म्हणजे उदात्त सम्यक जीवनाची दृष्टी होय. 19व्या शतकात "बाऊनमार्ट" ने सौंदर्यशास्त्राची निर्मिती केली. जैनांचा स्वादवाद, अनेकांवाद, बुध्दाचा अनात्मवाद, प्रतित्यसमुत्पाद, चार्वकांचा भौतिकवाद, कपिलचा साख्यंवाद, इस्लाममधला सुफीवाद, ख्रिस्तांचा प्रोटेस्टंट, सिनेगॉग्ज विरूध्दचा संघर्ष, हा त्या-त्या धार्मिक प्रवाहातले सारतत्व मुल्ये सौंदर्यशास्त्र होय. साहित्य हे केवळ रंजनाचे साधन नाही. ते समाजाच्या अंत:सत्वाचे निर्देशक आणि सामाजिक अंत:सत्वाचे निर्माणकारी आहे. त्यामुळै अशा अंत:सत्वाचे निर्माणकार्य निकोप असले पाहिजे. पण काही वेळा अशी निकोपताच व्यवसथेला निकारण अस्वस्थ करत असते. त्यातून पुढे तिच्या विमोडासाठी पडद्याआडून हालचाली सुरु होतात. आणि इथेच साहित्याच्या अभिमानी स्वातंत्र्याला बाधा पोहोचते. हा संघर्ष सच्चा कलावंत, दिग्दर्शक, निर्माता, लेखक निमुटपणे आपली भूमिका सज्जडपणे लखलखीत ठेवत असतो. सच्चा कलावंतांची ती खुण असते. विचार करणारा लेखक सामान्य जीवांकडे बघतो, आंदोलित होतो, चिंतीस्त होतो, म्हणून तो सांगतो, व्यक्त होतो, चिकित्सा करतो, चिकित्सा करायला भाग पाडतो, आपले सांस्कृतिक विद्रोहाचे सकारात्मक विधायक निर्मितीमुक्त अभिकृत करतो. अंधश्रध्दा, अज्ञान, जातीभेद, शोषण, आदि विघातक वृत्ती नष्ट व्हाव्यात आणि नव्या प्रबुध्द विवेकवादी समाजाची निर्मिती अस्वित्वात यावी या दृष्टीने सामाजिक स्थित्यंतर घडून यावे अशी त्याची सदोदित भूमिका असते. "In the poets religion we find no

doctrine or injuction but rather the attitude of entire being towards a truth which is ever to be revealed in its own endless creation. – Rabindranath Tagore.”

सौंदर्यशास्त्राची व्याप्ती – वामनाने सौंदर्याची व्याख्या “सौंदर्यमडंन्कार” अशी दिलेली आहे. अर्थात काही विशेष प्रकारची उक्ती, म्हणजे बोलण्याच पध्दती वा रिती, शैली वा अविष्कार ! दण्डी म्हणतो – “काव्यशोभाकराज धर्मान अलंकारान प्रयक्षते” म्हणजे अलंकार ! काव्याला शोभा आणणाऱ्या गोष्टी रिती रात्मा काव्यस्थ शैली वा रिती हाच काव्याचा आत्मा आहे. हे वामनाने नि:संदिग्धपणे सांगितलेले आहे. काव्यात आशयपेक्षा शैलीला अविष्काराला तो अधिक महत्व देतो. संगीतामध्ये स्वर व लय या घटकांची रचना कशी होते ? यावरच संगीतातल सौंदर्य अवलंबून असते. अविष्काराचे सौंदर्य हे त्याच्या घटकांचे पृथक सौंदर्य आणि मांडणी (Compositions) यावर अवलंबून असते. सौंदर्य वस्तुधर्म असल्याचे कुंतकाचे स्पष्ट होते. “क्षणे क्षणे यन्नवतामुपैति तदैव रूपं रमणीयताय |” हे माघाचे सुप्रसिध्द वचन आहे. रमणीयता अर्थात सौंदर्य म्हणजे नाविण्य दर क्षणाला जे नवीन वाटते ते सौंदर्य ! मसृणता हा मराठीतला अत्यंत सुंदर शब्द ! या गुणविशेषत्वाच श्री.रा.श्री.जोग यांनी विवेचन केले आहे. काव्यलंकार सुत्रात मसृणत्वं श्लेष: असे वामन वर्णन करतो. श्लेष हा येथे अलंकार नसून सरळ जाता येणे असं स्पष्टीकरण जोगांनी दिले आहे. मसृपता म्हणजे Smoothness अविष्कारातली सफाई, नितळपणा, सहजपणा, भारतीय सौंदर्यशास्त्रातला भोज हा एक महत्वाचा कवी त्याने सरस्वती कंठाभरण व श्रृंगारप्रकाश हा काव्यशास्त्रावरील ग्रंथ प्रसिध्द आहे. संविधाने सुसूत्रता हे महत्वाचे सुत्र त्याने सांगितले आहे. आकृतीमयता मांडणी वा रचना (Composition) किंवा संविधान यासाठी सुसूत्रता हे आवश्यक तत्वगुण त्याने मांडले आहे. कवी रूप गोस्वामी च्या शब्दात

**“मुक्ताफलेषु छाया**
**यास्तरलत्वमिवान्तरा**
**प्रतिभाति यदड:गेषु लावण्यं**
**तदिहोच्च्ते्”**

स्वर – लय – राग सर्व बरोबर असूनही योजना मांडणी नसेल तर विसंगती निर्माण होते. योजनावर्धक रचना व आकृती निर्माण करणं हे

चित्रकलेचं संगीतातलं ध्येय असते. कलेचं सौंदर्य म्हणजे रूपाचे, अविष्काराचे, रचनेचे सौंदर्य हे आधुनिक तत्वाज्ञानही मान्य् करतात. अविष्कारवाद किंवा Expressionism हे तत्वज्ञानाचे नाव ! ही परंपरा जर्मन तत्व्ज्ञ कांट यांच्यापासून निर्माण होते. सौंदर्यविषयी वस्तुनिष्ठ व न्यायनिष्ठ भुमिकांचा समन्वय कांट च्या तात्विक भूमिकेत दिसतो.

"The beutiful is that which a part from concept is represented as the object of universal delight" सार्वजनिक आनंदाचा विषय असणारी वस्तू ही सुंदर होय. सौंदर्याची कसोटी ही आनंद अर्थात रसिकनिष्ठ आहे. सौंदर्य ओळखण्याची खूण ही निरपेक्ष आनंद असे कांट मानतो. Beuty is the semblance of idia. अशी हेगेलची सौंदर्याची व्याख्या आहे. सौंदर्यनुभव म्हणजे सुखद अनुभूती (Pleasant feeling) असे बोसांके मानतो. क्रोचे कलेच्या मानसिक स्वरूपावर भर देतो. Intuition किंवा प्रतिभा हिचे कलाव्यापारात महत्वाचे स्थान आहे. सूचने हे महत्वाचे ! प्रतिमेची व्याख्या प्रज्ञा नवनवोन्मेष शालिनी प्रतिभामना अशी केली गेली आहे. प्रतिभेचा अविष्कार म्हणजे सौंदर्य क्रोचे रसिकगत अनुभवापेक्षा कलाकृतीच्या स्वरूपावर अधिक भर देतो. कला म्हणजे काय ? ते कळण्यापूर्वी कला म्हणजे काय नाही ? हे स्वच्छपणे कॉलिंगवुडने प्रथम सांगितलेले आहे. कॉलिंगवुड ने कलेची दोन व्यानच्छेदक लक्षणे सांगितलेली आहेत. अविष्कार व कल्पना सौंदर्याचा अविष्कार ! अविष्कारातून सौंदर्य ! अविष्कार हाच सौंदर्यमंत्र असतो. असे कॉलिंगवुड म्हणतो ! संवाद – विरोध – समतोल या तिन्हीस मिळून जे न्यायतत्व् निर्माण होते. त्या कथनत्वाला मर्डेकरांनी सौंदर्य म्हटले आहे. सौंदर्यांचे विश्लेषण करतांना मर्डेकरांनी वस्तुनिष्ठतेकडे मोठी मजल मारली आहे. श्री.रा.जोग, यांनी जोगांचा सौंदर्य विचार हा दुहेरी म्हणजे समन्वयात्मक असा आहे. रा.श्री.जोग यांचा मराठी वाङमयभिरणीचे (विहंगमालोकन 1959) हा प्रसिध्द ग्रंथ ! 1958 च्या पुणे विद्यापीठच्या न.चि.केळकर व्याख्यानमालेचे एक चांगले फलीत ! प्रा.जोगांनी मराठी साहित्याच्या प्रारंभापासून 1920 पर्यंतच्या कालखंडाचे विहंगमावालोकन केले. त्यात त्यांनी अभिरूची विषयीचा उहापोह मांडला आहे. तो लिखीत वाचण्या-अभ्यासण्यासारखा आहे.

औचित्य विचार हा त्यांच्या अभिरूची विचारांचा केंद्रबिंदू आहे. आशय व अभिव्यक्ती हा दोघांवरही अभिरूची परिणाम करत असते. अस त्याचं आग्रही मत होतं. अर्थात अभिरूचीची आस्वादकता ही सौंदर्यमुल्यांशी त्यांनी जोडली आहे.

सौंदर्य म्हणजे मेळ, प्रमाणबध्दता होय. शरीरातील सर्व अवयवांशी मेळ घालून प्रकट केलेले सौंदर्य पॅरी अँड्री – 1741 यांच्या मते सौंदर्य तीन प्रकारचे दैवी सौंदर्य, सहज सौंदर्य, कृत्रिम सौंदर्य ! ऑक्स्फर्ड डिक्शनरीमध्ये सौंदर्यशास्त्राचा अर्थ "A set of principles undertaking the work of particular artist or artistic movement" एका विशिष्ठ कलाकार किंवा कलात्मक हालचाली कृती यांच्या एकत्रित कार्यात्मक तत्वाचा संच म्हणजे सौंदर्यशास्त्र होय ! कांट च्या सौंदर्यशास्त्राच्या अंगाने त्यांचे शिष्य शिलेर चे लिखान भरपूर आहे. Critiasm of teast सौंदर्य ! निर्हेतूक आनंदातून ह्या सौंदर्याची उत्पत्ती होत असते. कलेचा अर्थ लिला जीवनातल सौंदर्य प्रकट करण म्हणजे कला. कांट शिवाय फिकटे, शेलिंग, हेगेल, फ्रेडरिक, श्लेगेल, एडम मुलर, सोल्ग्र, वेसी, रोझेन, फ्रेंस, अनौल रूगे, शिओडर व्हिशर यांची प्रचंड योगदान आहे. त्यांनी सौंदर्यशास्त्रास एका नव्या उंचीवर म्हणजे जीवनाच्या वास्तव्यावर आणण्याचे गौरवपूर्ण कार्य केले आहे. धुळ्याचे जगविख्यात विचारवंत कॉ.शरद पाटील यांनी सौंदर्यशास्त्राची ब्राम्हणी – अब्राम्हणी चिकित्सा करून भारतीय साहित्याची जी रोखठोक चिरफाड केली आहे. ती अगदी अव्दितीय ! लोकशाहीर – साहित्यसम्राट आण्णाभाऊ साठे, गुरुवर्य डॉ.यशवंत मनोहर, यांनी समस्त् साहित्् प्रणाली नव्या सौंदर्यशास्त्रांनी जी वैचारिक बैठक दिली ती खरं म्हणजे इथला भारतभूमीचा एतदेशीय मुलनिवासी नागवंशीय स्त्रीसत्ताक मानवतावादी सौंदर्यशास्त्राची पुनर्निमाणाची सांस्कृतिक मुळ प्रेरणेची प्रतिस्थापना आहे. गुरुवर्य वामनदादा करडक, प्रतांपसिंह बोदर्डे, संभाजी भगत, डॉ.विलास खरात, डॉ.रावसाहेब कसबे, विधीतज्ञ ॲड.राहुल वाघ, डॉ.नारायण भोसले,वाहरू सोनवणे, प्रणालीताई मराठे, डॉ.वंदना महाजन ही या नव्या सौंदर्यशास्त्राची ऊर्जाकेंद्र आहेत.

चित्रपटाच्या सौंदर्यशास्त्राचा विचार करतांना एका चित्रपटात कितीतरी चित्रपट दडलेले असतात.

एक रंगाचा चित्रपट, एक अवकाशाचा, तर एक गतीचा, एक रंगाचा चित्रपट, एक ध्वनीचा, एक कथानकाचा, एक अभिनय कौशल्याचा असे वेगवेगळे चित्रपट ! पाहणाऱ्यांची नजर जितकी खुललेली असते, तितके ते एकत्र दिसू व ऐकू येतात. जोपर्यंत तुमची प्रगल्भ नगर खुलत नाही. तोपर्यंत तुमच्या समोर जगातला सर्वोत्कृष्ट चित्रपट आला तरी तो तुम्हाला दिसणार नाही. यासाठी अस्वादकता, सौंदर्यदृष्टी हे आवश्यक घटक असतात. 1895 मध्ये ल्युमिए बंधुनी सिनेमॅटेग्रॉफ हे तंत्र तयार केलं. त्यामुळे दृष्य प्रतिमांच प्रक्षेपण, मुद्रण शक्य झालं. पुढे मुकपटाचा जन्म झाला. याचप्रमाणे 1877 मध्ये एडीसन याने फोनोग्राफ तयार केला. आणि ध्वनीचे मुद्रण – प्रक्षेपण शक्य झाले. 1920 च्या दशकात चलचित्रण मुद्रण आणि ध्वनीमुद्रण या दोन्ही तंत्राचा मिलाप होऊन बोलक्या चित्रपटांच तंत्रज्ञान विकसित झालं. चित्रपटाच्या दिग्दर्शकांच्या डोळ्यांनी, त्याच्या अविष्काराच्या अंगांनी, त्याच्या जणीवनेणीव च्या संवेदनांनी चित्रपटाचा आविष्कार प्रेक्षक बघू, पाहू आणि अनुभवू लागले. चित्रपटाची रचना ही फिल्ममेकर च्या अभिव्यक्तीची विशिष्ट पध्दत असते. हे समजुन घेणे महत्वाचे ठरते. सुक्ष्मरचना, स्थूलरचना, कार्य (Function), आशयसुत्र (Theme), मुल्य् (Value), अर्थ (Meaning), महत्वपूर्णता (Significance) या संदर्भात चित्रपट काय सांगतो ते सूक्ष्म आणि स्थुल रचनांच्या एकत्रिकरणातून अभिव्यक्त होत असते. हे काय ? म्हणजे अनेक आश्य सुत्रांची आंतरक्रिया त्यात असते. अर्थ आणि मूल्यांचा बिणीचा एक व्यामिश्र पोत तयार होतो. अगदी प्रत्यक्ष जीवनात जशी संदिग्धता, व्यामिश्रता अनुभवतो अगदी तशीच ! अर्थात मूल्य, आशयसूत्र, अभिव्यक्त होणाऱ्या भावना, यांच्या आंतरक्रियेची गुंतागुंत यात असते. एका चित्रपटात साधारणत: प्रेक्षक जवळ जवळ 800 ते 900 शॉट पाहत असतो. करमणुकीच्या ठोक गरजा भागविणारे, उत्पादन घडविणारे चित्रपट वेगळे असतात. आणि वास्तवाशी दोन हात करीत मूल्यांची तात्विक, वैचारिक भूमिका घेवून रोखठोक सज्जड भूमिका घेणार – सामाजिक अभिसरणाचे आव्हान पेलणारे चित्रपट वेगळे असतात. अर्थात असे समकालिकन चित्रपटाला जागतिक मूल्यांकन करणारी ऑस्कर सारख्या जागतिक सांस्कृतिक

विचारपीठानं अलिकडे वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था यावरचं यथार्थी प्रबोधन करणाऱ्या आव्हानात्मक चित्रपटांना विशेष गुण देण्याचा निर्णय घेतला आहे. तो निश्चितच समकालिन चित्रपट निर्मात्यांना – दिग्दर्शक, कलावंतांना उर्जादायी ठरला आहे. किंबहुना भारतातील हिंदी, मराठी इंडस्ट्रिने मात्र या अनिवार्यतेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले दिसते. समकालिन चित्रपटांना समिक्षात्मक अभ्यास, वैचारिक आकृतीबंध अत्यावश्यक असतो. आयझेन स्टाईन, ऑर्सन वेल्स, सत्यजित रॉय, अकिरा कुरोसावा, फेडरिको फॅलिनी, पी.एन.रामचंद्रा, पा.रंजित, आनंद पटवर्धन, संभाजी भगत, डॉ.मानसिंग पवार, मधुर भांडारकर आणि नागराज मंजुळे !

धर्माच्या पावित्राच्या नावाखाली दडलेली असंस्कृतता, पाश्वी वृत्ती, भांडवलशाहीच्या प्रवाहात परिस्थितीप्रिय जगणारी प्रवृत्ती, नवी सरंजामशाही, हिंदी मराठी इंडस्ट्रितली अभिजनवादी मोनोपॉली, त्याची पराकोटीची जातीय सांस्कृतिक अहंकाराची अपूर्व गर्विता, विषमतावाद, जातीवाद, स्त्रीशोषण या सर्व प्रवाहांशी स्वतंत्र झुंज देत नागराज मंजुळेंच्या दिग्दर्शनाचा एकूणच त्यांच्या तात्विक भूमिकेन जगण्याने, त्यांच्या शैलीने विवेकवादी सांस्कृतिक जीवनाची समकालिन नवसर्जनता प्रदान करण्याच काम "फॅन्ड्री", पिस्तोल्या, सैराट, झुंड या चित्रपटांची निर्मिती, नवा सांस्कृतिक वाद नागराज मंजुळेंनी निर्माण केला आहे. अभिजनवादाशी अप्रत्यक्षपणे संघर्ष करीत नागराज मंजुळेंच्या अंतस्थ मनस्वी कवीच्या कॅमेरॅने जे वास्तववादी जीवन दिग्दर्शित केलयं त्याला खरं म्हणजे मानवतावादाची वैचारिक, सैदांतिक बैठक असल्याने प्रस्तापित सांस्कृतिक प्रवाहांना नागराज मंजुळेच्या अविष्काराच्या अभिव्यक्तीला रोखण्याचे सामर्थ्य त्यांच्यात अजिबात नाहीये. अर्थात विरोध करण्याच मनसुबा असून सुध्दा नागराजजींच्या तेजस्वी प्रतिमेपुढे ते नतमस्तक आहेत. अर्थात बहुसंख्य बहुजन भारताचे प्रचंड समर्थन पाठीशी असल्याने अभिजनवाद्यांना नागराज मंजुळेची सर्जनता बंदिस्त करणं परवडणारं नाही. हे सूर्यप्रकाशा इतकं सत्य आहे. मानवी जीवनातले मूलभूत प्रश्न, समस्या, अन्याय अत्याचार, शोषण, आर्थिक विषमता यावर समर्पक भाष्य चितारणारे नागराज मंजुळे यांनीच सर्वप्रथम हिंदी मराठी इंडस्ट्रितला कल्पनेच्या भरारी घेणाऱ्या बेधुंद चंगळवादी प्रतिभांना

झोपडपट्टीच्या असली जिंदगानीशी रूबरू करीत समकालिन आयुष्याची जाणीव नेणीवच्या पातळीवर आणण्याचे आव्हान समर्थपणे पेलले आहे.

राजकिय सत्ताकेंद्रे हि सतत भांडवलशाहीच्या समर्थनार्थ जगत असते. धर्मवादाच्या बोझ्याखाली त्यांना लोकशाहीचं सोंग करावं लागतं. ही त्यांची अनिवार्यता भारतीय संविधानामुळे करावी लागते. त्यांचा तो नाईलाज असतो. भांडवलशाहीच्या व्यापक समर्थनात अभिजनवादी, कलावादी, रसालंकारादी, सौंदर्य दृष्टीकोनाचा थिटेपणा अंगीकारक बहुसंख्य जनतेला मनोरंजनाच्या आणि हास्यविनोद, तर स्त्री वर्गाला कायम सुरुची पाककलेत तर कधी पावित्र्याच्या संस्काराच्या नावाखाली अध्यात्माचे सत्संग योजनापूर्वक पुरविले जात असते. प्रस्थापितांच्या हाती सारी व्यवस्था आणि प्रस्थापितांच्या सोयीने मूल्यव्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रस्थापित सांस्कृतिक सत्ता आपली मनुस्मृतीय पुरुषसत्ताक संस्कृतीची आचारप्रणाली बिनदिक्कतपणे राबवत असते. ही भेदरेषा मानवतावादी, समतावादी दृष्टीकोन असलेले “बायसिकल थीव्ज” ची जाण असलेले सुब्रतो मित्रा सारखे निओरिअलिस्ट दिग्दर्शक नागराज मंजुळे सारखे दिग्दर्शक हा आजच्या नव्या दिग्दर्शकाच्या सत्यान्वेषी प्रवाहासाठी आदर्श आहेत. प्रारंभी पोलिस कॉन्सटेबल, स्टेशनरी दुकान चालक, टेलिफोन बुथ चालक, नंतर भारतभ्रमण करणारा ड्रायव्हर असा जीवनप्रवास केलेले नागराजजी उर्फ आण्णा मुळात मनस्वी कवी आहेत. 24 ऑगस्ट 1977 करमाळा येथे जन्मलेले कवी नागराज मंजुळे यांचा “उन्हाच्या कटाविरूध्द” हा काव्यसंग्रह प्रसिध्द आहे. 2014 फॅन्ड्री, 2016 सैराट, 2018 झुंड आणि आता 2023 घर-बंदुक-बिर्याणी चित्रपट ! आदी त्यांचे आकृतीबंध आहेत. छुप्या दडपशाहीचे वर्तुळ भेदण्याचं साम्यर्थ्य लाभलेले नागराज आण्णा मंजुळे विचार करणारा, विचार करायला लावणारा दिग्दर्शक कवी आहे. त्यांचे चित्रपट पाहिल्यानंतर प्रेक्षक तृप्त होत नाही तर अस्वस्थ होतो, आंदोलित होतो, चिंतीस्थ होतो, तो चिकित्सा करायला लागतो. हेच नागराजजींच्या चित्रपटाचं यशमूल्य आहे. आशय, घाट, कथावस्तू, यांच भव्य परंतु वास्तववादी दिग्दर्शन त्यातून समिष्टी टिपण्याची अचूक सूक्ष्मता नागराजजींच्या दिग्दर्शनाचं बलस्थान आहे. गुरुवर्य डॉ.बाबासाहेब

आंबेडकरांची जयंती असो कि "जयभिम" च मानवतावादी संबोधन असो, हे सिनेमाच्या पडद्यावर दाखविण्याचं धाडस नागराज मंजुळे यांनीच सर्वप्रथम केले आहे. समकालिन चित्रपटाच्या युगातली ही क्रांतीकारक घटना म्हणावी लागेल. (त्यात आपला चित्रपट पडला ? तर आपल्या दिग्दर्शनाच्या यशापयशाचं काय ? याची जराही भिड न बाळगता "निडरता" हा गुण आण्णांचा विशेष उल्लेखनिय आणि दैदिप्यमान असाचं !) कन्सॉर्टियम फॉर एज्युकेशन – कम्युनिकेशन सारखं विचारवेधी उपक्रम साकारणाऱ्या चित्रपटाचे सौंदर्यशास्त्राची आस्वादकता अभ्यासणारे एफटीआय चे प्रा.सतिश बहादूर किंवा मग अभिव्यक्तीच्या क्षमतांची जाणीवा चित्रपटांच रसग्रहण, तिची गंभीरता समजावून सांगणारे एफटीआय चे अधिष्ठाता समर नकाते असो. यांच्या प्रोत्साहनाने – प्रेरणेने नवे दिग्दर्शक घडत आहेत. परंतु सामाजिक मुल्यांशी, सामाजिक पर्यावरणाशी घट्ट नातं सागणारे नागराज मंजुळे आण्णा फॅन्ड्री पचवुन अख्ख्या हिंदी मराठी इंडस्ट्रिला फ्रेंडली होण्याचं आशयसुत्र दिले आहे. एकूणच तळमळीचं जीवनवादी भूमिका घेत व्यापक संशोधन चिकित्सा आपल्या चित्रपटातून दिग्दर्शित करणारे नागराज मंजुळे नव्या मानवतावादी, समतावादी सर्जनतेचा वस्तुपाठ आहे.

"सामाजिक न्यायमूल्यांचा, शोषित वंचितांच्या उत्थापनाच्या, सांस्कृतिक पुर्नमांडणीचा विवेक व विद्रोही भूमिका म्हणजे नागराज मंजुळेंच समकालिन दिग्दर्शन आणि प्रतिभा आविष्कार होय ! जुनी व्यवस्था जुन्या मुल्य व्यवस्थेला नाकारतांना नवी व्यवस्था, नवी मूल्यव्यवस्था प्रस्थापित करण्याची मनस्वी तळमळ असलेला दिग्दर्शक नागराज मंजुळे एक अस्वस्थ मनाचा शोध आहे ! एक कमालीची हुरहुर, अनाकलनीय आगतिकता, अजय-अतुल च्या भरदार संगतीसारखी ती विद्रोहाची हाक आहे. अर्थात हा विद्रोह विध्वंसंक नाही. सर्जनशील आणि संवेदनशील आहे. तो व्यवस्थेला प्रश्न विचारतो आहे. तो परिस्थितीप्रिय समाजाला जाब विचारतो आहे. नागराजजी स्वत: उत्तम कवी आहेत. त्यामुळे सहनशीलवृत्ती सोबत अभिनयाची आक्रमकता देखील त्यांच्या अभिव्यक्तीत स्पष्ट जाणवते. त्यांची वृत्ती संवेदनशील कवी मनाची आहे. परंतु स्वभाव मात्र विद्रोही चळवळीच्या कार्यकर्त्याची आहे. एक

नवा "क्रांतीसूर्य" हिंदी मराठी इंडस्ट्रिला दमदारपणे दाखवून देणारा, त्या झुंझार सूर्याचं तेज त्याची अनुभूती प्रत्यक्ष करून देणारा हा दिग्दर्शक ! भांडवलशाहीच्या सांस्कृतिक समुद्री वादळात "जयभिम" ची नौका घेवून आण्णाभाऊ साठेंच क्रांतीगीत गातो आहे. आव्हानात्मक आयुष्य जगत असतांना यश-अपयशाच्या आणि ग्लॅमलर आयुष्याच्या पलीकडे जाऊन शोषित, वंचित समाजाला मानवमुक्तीची त्यांना सतत ध्यास लागले आहे. त्यांची ही ध्येयासक्तीच कोटी-कोटी शोषित वंचित, भुकेल्या समाजाला आकर्षित करणारी आहे. नागराजजींच्या रूपाने या शोषित वंचित समाजाला आपली सांस्कृतिक मुक्ती दिसते आहे. नव्हे त्यात क्रांतीची बीजे त्याला अदृश्यपणे जाणवत आहेत. नागराज मंजुळे हे दिग्दर्शक नव्हे एक समकालिन चळवळ आहे !

**संदर्भग्रंथ –**


1) भंजनांचे भंजन – प्रा.डॉ.प्रल्हाद लुलेकर,
2) चित्रपटाचे सौंदर्यशास्त्र – प्रा.सतिश बहादूर
3) संगीत आणि सौंदर्यशास्त्र – डॉ.सुलभा ठकार
4) आणि साहित्य...! – गो.म.कुलकर्णी
5) साहित्य समाज आणि संस्कृती – दिगंबर पाध्ये
6) ॲड.राहुल वाघ यांची भाषणे – संपादन प्रा.डॉ.घन:श्याम थोरात